सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

दि. १८ जानेवारी २०१२

## परिपत्रक

**विषय:** वृत्तवाहिन्यांवरील चर्चात्मक कार्यक्रमांच्या परवानगीबाबत.

विविध वृत्तवाहिन्यांकडून राज्य निवडणूक आयोगाकडे निवडणुकीसंदर्भातील चर्चात्मक कार्यक्रमाच्या परवानगीबाबत वारंवार विचारणा होत आहे. याबाबत असे स्पष्ट करण्यात येत आहे की, अशा कार्यक्रमांवर राज्य निवडणूक आयोगाने निर्बंध घातलेले नाहीत.

वृत्तवाहिन्यांवरील चर्चात्मक कार्यक्रम प्रसारित करताना धार्मिक किंवा जातीय तेढ, तसेच कायदा व सुव्यवस्था भंग होणार नाही, याची काळजी घ्यावी. त्याचबरोबर अशा कार्यक्रमाद्वारे कुठल्याही एका पक्षाचा किंवा उमेदवाराचा प्रचार होणार नाही, याचीही दक्षता घेणे आवश्यक आहे. सार्वजनिक ठिकाणी कार्यक्रम करण्यासाठी आवश्यक असलेल्या पोलिस किंवा इतर परवानग्या स्थानिक अधिकाऱ्यांकडून घेण्यात याव्यात.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

(अविनाश सणस)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग,
महाराष्ट्र